**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**

**रिकामा प्लास्टीक बारदाना व तेल डबा जाहीर लिलावात सहभागी होणेसाठी अर्ज**

दिनांक - /09/2025

प्रति,

मा. कार्यकारी अधिकारी,
श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर, जि.सोलापूर.

विषयः- रिकामा बारदाना व तेल डबा जाहीर लिलाव.

अर्जदाराचे पूर्ण नावः- ------------------------------------------------------------------

पूर्ण पत्ता:- ------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

मोबाईल क्रं.:- ------------------------------------------------------------------

महोदय,

वरील विषयात नमूद केले प्रमाणे विनंती अर्ज करतो की, आपलेकडील दिनांक -----/09/2025 रोजीचे वर्तमानपत्रातील मंदिर समितीच्या रिकामा बारदाना व तेल डबा जाहीर लिलावाची जाहिरात वाचली असून मला सदर लिलावात सहभाग घेण्याची इच्छा आहे. त्यासाठी अनामत रक्कम रू.5,000/- रोखीने / डी.डी. ने भरलेली आहे. सदरच्या लिलावाबाबतच्या मंदिरे समितीच्या सर्व अटी, शर्ती व सूचना (वेबसाईट वरील आणि अर्जासोबत दिलेल्या) मला मान्य आहेत व त्याचे मी तंतोतंत पालन करीन.

1) फॉर्म फी व अनामत रक्कम डिमांड ड्राफ्टने दिली असल्यास बॅंकेचे नांव, डी.डी. क्रमांक व दिनांक (सोबत डि.डि. जोडला आहे.)

   ----------------------------------------------------------------------------------------------------

2) फॉर्म फी व अनामत रक्कम रोख भरली असल्यास पावती क्रमांक व दिनांक (सोबत पावतीची झेरॉक्स प्रत जोडली आहे.)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

3) सोबत ओळखीचा पूरावा म्हणून ---------------------------------ची झेरॉक्स प्रत जोडली आहे.

4) सोबत रहिवासाचा पूरावा म्हणून ---------------------------------ची झेरॉक्स प्रत जोडली आहे.

2/- रिकामा बारदाना व तेल डबा खरेदीचा माझा दर मी खालीलप्रमाणे नमुद करीत आहे.

| अ. क्र. | मालाचा तपशिल | किमान बोलीची किंमत (रू.) प्रति नग | ठेकेदाराने खरेदीसाठी नमुद केलेली जास्तीतजास्त किंमत (रू.) प्रतिनग |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 01 | साखर व हरभरा दाळीचा प्लास्टीक बारदाना (50 किलो) | 04 | |
| 02 | साखर व हरभरा दाळीचा खराब प्लास्टीक बारदाना (50 किलो) | 03 | |
| 03 | रिकामा तेल डबा (15 किलो) | 31 | |
| 04 | रिकामा खराब तेल डबा (15 किलो) | 15 | |

सदरच्या मी नमुद केलेल्या दराने रिकामा बारदाना व तेल डबा खरेदी करण्यास बांधील राहील.

आपला विश्वासू,

(नाव व सही)

सोबत :- वरीलप्रमाणे.

**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**

**रिकामा बारदाना व तेल डबा जाहीर लिलाव**

माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे.....

1) विक्री करावयाच्या मालाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशिल | वार्षिक अंदाजे विक्री नग |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| 1 | साखर व हरभरा दाळीचा प्लास्टीक बारदाना (50 किलो) | 2500 |
| 2 | साखर व हरभरा दाळीचा खराब प्लास्टीक बारदाना (50 किलो) | 500 |
| 3 | रिकामा तेल डबा (15 किलो) | 6000 |
| 4 | रिकामा खराब तेल डबा (15 किलो) | 500 |

2) नमूना लिलाव अर्ज कार्यालयीन वेळेत श्री. तुकाराम भवन, पंढरपूर व एमटीडीसी भक्तनिवास, पंढरपूर येथे उपलब्ध होवून मिळतील. तसेच www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर मिळतील.

3) लिलाव फॉर्म भरून दि.27/09/2025 स.11.00वा. पर्यंत श्री. तुकाराम भवन, पंढरपूर येथे दाखल करणे आवश्यक आहे. लिलाव अर्ज समक्ष तुकाराम भवन येथे सादर करावेत किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

4) लिलाव अर्जासोबत फॉर्म फी रू.500/- व अनामत रक्कम रू.5,000/- चा कार्यकारी अधिकारी, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या नावाचा डी.डी. किंवा रोखीने रक्कम जमा केल्याची पावती सादर करणे आवश्यक आहे.

5) लिलाव अर्ज, फॉर्म फी व अनामत रकमेचा डि.डी. /रोखीची पावती सिलबंद पाकिटात दि.27 /09/2025 रोजी सं.11.00 वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक राहील. सिलबंद पाकिटावर ठेकेदाराचे पूर्ण नाव, पत्ता, मोबाईल क्र. व रिकामा बारदाना व तेल डबा जाहीर लिलाव फॉर्म असे नमुद करणे आवश्यक आहे. सिलबंद लिलाव अर्ज दि. /10/2025 रोजी दु.12.00 वा. एमटीडीसी भक्तनिवास, पंढरपूर येथे सर्व ठेकेदारांच्या समक्ष उघडण्यात येतील. ज्या ठेकेदारांना त्यावेळी इतर ठेकेदाराने नमुद केलेल्या दरांपेक्षा जास्त दराने बोली बोलावयाची असल्यास तशी संधी त्यावेळी देण्यात येईल. ज्या ठेकेदाराने जास्तीत जास्त दर नमुद केला असेल किंवा जास्तीतजास्त दर बोलला असेल त्याच्या नावे लिलाव मंजुर करण्यात येईल.

6) ज्याचे नावे लिलाव मंजुर होईल. त्यांनी लिलावाची होणारी रक्कम 7 दिवसात भरणा करून माल उचलणे आवश्यक आहे. मुदतीत रक्कम भरली नाही अथवा माल उचलला नाही तर सदरचा मंजुर लिलाव रद्द केला जाईल व अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

7) माल विक्रीचा कालावधी कार्यारंभ आदेश दिल्यापासून एक वर्षाचा राहील. लिलावात मंजुर झालेल्या दराने प्रतिमाह माल घेणे मंजुर लिलावधारकास बंधनकारक राहील. या वर्षभराच्या कालावधीत मंजुर दर कोणत्याही परिस्थितीत कमी केला जाणार नाही.

8) याशिवाय, मंजुर दराने एक वर्ष कालावधीत प्रतिमहा 5 तारखे अगोदर आगाऊ स्वरूपात रक्कम जमा करून प्रतिमाह माल उचलणे मंजुर लिलावधारकांवर बंधनकारक राहील.

9) कोणताही अर्ज अगर सर्वच अर्ज कोणतेही कारण न दर्शविता नाकारणे किंवा स्विकारणे अथवा स्थगित ठेवणे किंवा रद्द करणे याबाबतचे संपूर्ण अधिकार मंदिर समितीने राखून ठेवले आहेत.

10) लिलावातील माल एमटीडीसी भक्तनिवास, पंढरपूर या ठिकाणी कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

11) सदरचे साहित्य लिलाव धारकांने स्वतःचे मजुर व वाहन लावून मंदिर समितीचे प्रतिनिधी समोर उचलणेचे आहे.

12) नमुन्यातील अर्जासोबत ओळखीचा पूरावा म्हणून निवडणूक ओळखपत्र/आधारकार्ड/ड्रायव्हींग लायसंन्स/राश्ट्रीय बॅंकेचे पासबुक/पॅनकार्ड यापैकी एकाची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे. तसेच लिलावाचे वेळी मुळ ओळखपत्र आणणे आवश्यक आहे.

13) रहिवासी पुराव्यासाठी स्वतःचे नावाचे लाईट बील किंवा फोन बीलाची एक प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

14) लिलाव मंजुर झाल्यानंतर 7 दिवसांचे आत करारनामा करुन देण्यासाठी रु.100/- चा गैरन्यायीक स्टॅम्पपेपर जमा करावा, परंतू अशाप्रकारे करारनामा करुन दिला नाही, अथवा त्याबद्दल टाळाटाळ केल्यास कार्यादेश रद्द करणेत येईल.

15) मंदिर समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटी व शर्तीत जे बदल करेल ते लिलावधारकांस बंधनकारक राहील.

16) सदर कामासंबंधी काही वाद उद्भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

17) प्रशासकीय व अन्य कारणास्तव किंवा कोणतेही कारण न देता लिलाव कोणत्याही स्तरावर रद्द अथवा स्थगित ठेवण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

xxx

O;oLFkkid]
Jh foðy :fDe.kh eafnjs
lferh]
ia<jiwj